महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/प्रवेश मान्यता/शै.वि.-३/२०२४/३३७६
दिनांक : 27 SEP 2024

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी औषधनिर्माणशास्त्र व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..**

**संदर्भ :** १. संचालनालाचे परिपत्रक क्र.२/ एनजीसी/Intake approval/२०२४/४४० दि.०३.०७.२०२४
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीस/औषधनिर्माणशास्त्र/प्रवेश क्षमता/२०२४/७९९ दि. २७.०९.२०२४

उपरोक्त विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणाऱ्या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून सलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या https://approval24.dtemaharashtra.gov.in या लिंकवर अद्ययावत करुन दि.१९.०७.२०२४ रोजी सायंकाळी ०५.५० वाजेपर्यत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र. ०१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र दरम्यानच्या काळात शिखर परिषदेची मान्यते अभावी बऱ्याच संस्थानी माहिती अद्ययावत केले नसल्याचे निदर्शनास आले होते.

सबब औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांच्या संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती व प्रवेशक्षमता अद्ययावत करुन **दि.०१.१०.२०२४ रोजी सायंकाळी ३:०० वाजेपर्यत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.** (सोबत संचालनालयाचे परिपत्रक जोडण्यात येत आहे.)

ज्या संस्था प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२ ६८५९७४६५/४९२/४५२/५४३/४४७

ई-मेल – [illegible]@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://[illegible]

परिपत्रक

क्रमांक : २ /एनजीसी/औषधनिर्माणशास्त्र/प्रवेश क्षमता/२०२४/७९९ दिनांक : 27 SEP 2024

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील साठी औषधनिर्माणशास्त्र व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/Intake Approval/२०२४/४४०, दि.३.७.२०२४

२)मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा, मुंबई यांचे वेळापत्रक क्र.TED-1224/C.R. No. 06/CAP/M Pharm Admission Notice 5/2024/1681, दि. १९/०९/२०२४

३)मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा, मुंबई यांचे वेळापत्रक क्र.TED-1224/C.R. No. 06/CAP/M Pharm Admission Notice 5/2024/1681, दि.१९/०९/२०२४

४)फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र.Ref No.14-56/2022-PCI (Approval Process for २०२४-२०२५) Dated-१५.०९.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. संस्थाबाबतची औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या https://approval24.dtemaharashtra.gov.in या लिंकवर अद्ययावत करून दि.१९ जूलै २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र दरम्यानच्या काळात शिखर परिषदेची मान्यते अभावी ब-याच संस्थांनी माहिती अद्ययावत केले नसल्याचे निदर्शनास आले होते.

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताची मान्यता प्रक्रिया अंतिम टप्पात असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्यांनी जवळपास सर्व विद्यमान संस्थांची मान्यतेची कार्यवाही पुर्ण केल्याचे देखील नमुद केले आहे. त्याचबरोबर सर्व प्रवेश नियामक प्राधिकरणांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याची विनंती केलेली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याद्वारे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अंतिम गुणवत्ता यादी पर्यंतचे वेळापत्रक संदर्भ क्र.२ व ३ अन्वये प्रसिद्ध केले आहे. तसेच कॅपच्या विविध फेरींकरिता विकल्प अर्ज (ऑप्शन फॉर्म) भरणे, कॅप जागा वाटप, जागा स्वीकृती करणे, उमेदवाराने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादींबाबतचे पुढील वेळापत्रक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याद्वारे लवकरच प्रसिद्ध करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांच्या संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती व प्रवेशक्षमता अद्ययावत करुन दिनांक ०१.१०.२०२४ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. तसेच संस्थांनी सादर केलेली माहिती

संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे पडताळणी व प्रमाणित करुन घ्यावी. तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे दिनांक ०१.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

ज्या संस्था प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करणार नाहीत, तसेच संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे प्रमाणित करुन घेणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.०१ ऑक्टोबर, २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य, सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

४. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई
यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.